# MUNGASAJI MAHARAJ MAHAVIDHAYALAYA,

# DARWHA, DiST. YAVATMAL

## DEPARTMENT OF ECONOMICS

## Session 2021-2022

***Sant Shree Dhola Maharaj's Visit to Old Age Home Umri Pathar on 21 September 2021***




***Dr. Shankar Sawant guiding the National Service Scheme induction class at Jijamata College Darwah on 22nd December 2021***



***On the occasion of the inauguration of the Board of Economics Studies on 22nd March 2022, Dr. Rajendra Bhandwalkar Yavatmal***




***On the occasion of the inauguration of the Board of Economics Studies on 22nd March 2022, Dr. Shankar M. Sawannt***



***Punyanagari newspaper published the news about the inauguration of Arthashastra Abhyas Mandal***

# मुंगसाजी महाराज महाविद्यालयात व्याख्यान

**सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन**



**पुण्य नगरी** /तालुका प्रतिनिधी

**दारव्हा :** मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास व समाजशास्त्र आदी सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन व मान्यवरांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या अभ्यास मंडळाच्या उद्घाटना प्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे, प्रमुख अतिथी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटक प्राचार्य डॉ. एम. डी. वडते, नेहरू महाविद्यालय नेर, अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटक डॉ. राजेंद्र बी. भांडवलकर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ, इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटक डॉ. सिद्धार्थ बी. जाधव, नानकीबाई वाधवानी कला महाविद्यालय, यवतमाळ, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटक डॉ. विजय गावंडे सुमित्राबाई देशमुख महाविद्यालय, दिग्रस यांची उपस्थिती होती. डॉ. एम. डी. वडते यांची प्राचार्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल व डॉ. राजेंद्र भांडवलकर यांची मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य एम.डी. वडते यांनी गाडगे महाराजांच्या विचारावर प्रकाश टाकला. तसेच शिक्षण घेताना आपल्या शिक्षणाचा अधिकाधिक उपयोग हा समाजासाठी करावा, असे आवाहन केले. राजेंद्र बी. भांडवलकर यांनी होळीचे अर्थशास्त्र त्याचप्रमाणे विदर्भ विकासाचा प्रश्न व व विदर्भात निर्माण झालेल्या शेतकरी आत्महत्याचा प्रश्न यावर अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी कार्य करावे, असे आवाहन केले. डॉ. सिद्धार्थ बी. जाधव यांनी इतिहास लेखनामध्ये सामाजिक माध्यमांची उपयुक्तता यावर मार्गदर्शन केले. डॉ. विजय गावंडे यांनी लोकशाही आणि आजचा विद्यार्थी या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. सुनील चकवे यांनी अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास व समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी ओळखून विविध विद्यार्थी उपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करावे, असे आवाहन केले. प्रास्ताविक डॉ. शंकर सावंत यांनी केले. संचालन डॉ. संदीप भुरले यांनी केले. डॉ. नितीन भिंगारे यांनी आभार मानले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. संतोष चतुर, प्रा. सुनील डंभारे, डॉ. मनीष मोहरील, प्रा. दिनेश बावने यांची उपस्थिती होती.

***Namo Maharashtra newspaper published the news about the inauguration of Arthashastra Abhyas Mandal***

# सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन

**नमो महाराष्ट्र**

दारव्हा/प्रतिनिधी

दिनांक 22 मार्च 2022 रोजी स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास व समाजशास्त्र इत्यादी सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन व अतिथी व्याख्यान संपन्न झाले. अभ्यास मंडळाच्या उद्घाटना प्रसंगी अध्यक्षीय स्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे तर प्रमुख उपस्थितीमध्ये समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटक प्राचार्य डॉ. एम. डी. वडते, नेहरू महाविद्यालय नेर, अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटक डॉ. राजेंद्र बी. भांडवलकर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ, इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटक डॉ. सिद्धार्थ बी. जाधव, नानकीबाई वाधवानी कला महाविद्यालय, यवतमाळ, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटक डॉ. विजय गावंडे सुमित्राबाई देशमुख महाविद्यालय, दिग्रस आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गीताने करण्यात आली त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तदनंतर पाहुण्यांच्या स्वागतामध्ये डॉ. एम. डी. वडते यांची प्राचार्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल व डॉ. राजेंद्र भांडवलकर यांची मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करताना प्राचार्य एम.डी. वडते यांनी आपले मनोगत व्यक्त करताना गाडगे महाराजांच्या विचारावर प्रकाश टाकून ज्याप्रमाणे गाडगे महाराजांनी सामाजिक कार्य केले त्याप्रमाणे आजच्या समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी सुद्धा सामाजिक कार्य करावे व देश निर्मितीस हातभार लावावा तसेच शिक्षण घेताना आपल्या शिक्षणाचा अधिकाधिक उपयोग हा समाजासाठी करावा असे आवाहन केले. त्यानंतर अर्थशास्त्र अभ्यास मंडळाच्या उद्घाटनाप्रसंगी अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन राजेंद्र बी. भांडवलकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना होळीचे अर्थशास्त्र त्याचप्रमाणे विदर्भ विकासाचा प्रश्न व व विदर्भात निर्माण झालेल्या शेतकरी आत्महत्या चा प्रश्न यावर अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी कार्य करावे. तसेच विदर्भाच्या परिसरात शेती पूरक उद्योगांची निर्मिती करण्याकरिता विदर्भातील राजकीय नेत्यांवर विद्यार्थ्यांनी दबाव आणावा असे आवाहन केले. परिस्थिती ही नेहमीच प्रतिकुल असते आणि त्या प्रतिकूल परिस्थितीत आपल्याला मार्ग काढून यश संपादित करायचे असते म्हणून उद्या येणारा प्रतिकूल परिस्थितीनुरूप विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये बदल घडवून यश संपादित करावे असे स्पष्ट केले. त्यानंतर इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटक डॉ. सिद्धार्थ बी. जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना इतिहास लेखनामध्ये सामाजिक माध्यमांची उपयुक्तता यावर आपले मनोगत व्यक्त करताना इंस्टाग्राम, फेसबुक, व्हाट्सअप,ट्युटर साधनांची उपयोगिता ओळखून या साधनांचा इतिहास लेखना करिता वापर कसा करता येईल व आजच्या इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी इतिहास लेखना करता ही माध्यमे कशी उपयोगात आणता येईल यावर मत व्यक्त केले. पूर्वीपेक्षा आज ही साधने इतिहास लेखना करिता उपयुक्त ठरत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी या साधनांची सत्यता ओळखून इतिहास लेखनात या साधनांचा उपयोग करावा असे आवाहन केले. त्यानंतर राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटक डॉ. विजय गावंडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लोकशाही आणि आजचा विद्यार्थी या विषयावर आपले मनोगत व्यक्त करताना स्पष्ट केले की आजच्या विद्यार्थ्यांनी भारताची लोकशाही सुदृढ बनवण्याकरिता लोकप्रतिनिधी निवडून देत असतांना धर्माचा विचार न करता गुणवत्तेचा विचार करून लोकप्रतिनिधीची निवड करावी व भारताला सक्षम लोकशाही प्रधान राष्ट्र बनवावे असे आव्हान केले. सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनिल चकवे यांनी चारही वक्त्यांच्या भाषणाचा सार मांडला तसेच अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास व समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी ओळखून विविध विद्यार्थी उपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करावे असे आवाहन केले. अभ्यास मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शंकर सावंत तर सूत्रसंचालन इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. संदीप भुरले यांनी तर आभार समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नितीन भिंगारे यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमाचे प्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. संतोष चतुर ,प्रा. सुनील डंभारे, डॉ. मनिष मोहरील, प्रा. दिनेश बावने यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास महाविद्यालयातील सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते तसेच कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाच्या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.


# MUNGASAJI MAHARAJ MAHAVIDHAYALAYA,
# DARWHA, DiST. YAVATMAL

## DEPARTMENT OF ECONOMICS
## Session 2022-2023

*While Planting Trees in the College Premises*




*While Guiding in the Induction Program*



*Goodwill Visit to the College at Chikhli Buldhana*




*While Guiding the NSS Special Camp of Jijamata College Darwha, Bhulai*




*While Guiding the NSS Special Camp of Bhaushahe Lahane Dnyanprakash College Pinjar, Titwa*



## *Conducting Degree Distribution Programe*



नवराष्ट्र

यशोमंत्र • डॉ. संगीता घुईखेडकर यांचे आवाहन; मुंगसाजी महाराज महाविद्यालयात पदवी वितरण

# विद्यार्थ्यांनो, बुद्ध विचारांप्रमाणे स्वयंप्रकाशित व्हा



**दारव्हा** (ता.प्र.). पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी बाहेरच्या युगात जगताना इच्छाशक्ती, संकल्पशक्ती व तपस्या या तीन गुणांचा अंगीकार करावा. या तीन गुणांच्या आधारावरच मनुष्य त्यांच्या जीवनात ध्येय प्राप्त करू शकते. प्रत्येकासाठी माता, मातृभाषा व मातृभूमी हे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे प्रत्येकांनी या तीन श्रद्धास्थानांचा आदर करावा. सोबतच भगवान गौतम बुद्धांच्या अत, दीप, भवच्या शिकवणीचा अंगीकार करावा. अत, दीप, भव म्हणजे स्वयंप्रकाशित होणे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी गौतम बुद्धांच्या विचारांप्रमाणे स्वतःला स्वयंप्रकाशित करून आपले राष्ट्र प्रकाशित करावे, असे आवाहन कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. संगीता घुईखेडकर यांनी केले. दारव्हा परिसरात विद्या प्रसारक मंडळाच्या माध्यमातून अनेक पदवी व पदव्युत्तर शिक्षण दिले जात आहे. या उच्च शिक्षणाच्या सोयी परिसरातील विद्यार्थ्यांना उपलब्ध झाल्यामुळे त्यांनी विद्या प्रसारक मंडळ स्थापन करण्यात सिंहाचा वाटा उचलणारे बाळासाहेब घुईखेडकर व त्यांच्या सहकाऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा येथे वसंत घुईखेडकर यांच्या मार्गदर्शनात पदवी वितरण समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संगीता घुईखेडकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. एच. एम. धुर्वे, उपविभागीय अधिकारी संजय खडसे, विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष विराज घुईखेडकर,

## 376 विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

पदवी वितरण समारंभाप्रसंगी महाविद्यालयातील कला शाखेतील 34, वाणिज्य शाखेतील 56, विज्ञान शाखेतील 60 विद्यार्थ्यांना तर पदव्युत्तर विभागातील एम.ए. समाजशास्त्र 51, एम.ए. राज्यशास्त्र 51, एम.ए. गृहअर्थशास्त्र 9, एम.ए. मराठी 13, एम.ए. इतिहास 10, एम.कॉम. 69, एम.एस.सी. रसायनशास्त्र 7, एम. एस. सी. गणित 10, एम. एस. सी. भौतिकशास्त्र 6 अशा प्रकारे एकूण 376 पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

प्राचार्य डॉ. विलास राऊत, उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. विलास राऊत यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. एच. एम. धुर्वे, संजय खडसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे यांनी तर संचालन वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. खुशाल ढवळे केले. आभार डॉ. शंकर सावंत यांनी मानले. समारंभाच्या यशस्वीतेसाठी डॉ. खुशाल ढवळे, डॉ. शंकर सावंत, प्रा. प्रियंका रुईकर, प्रा. नेहा मोहुरकर, डॉ. संतोष चतुर, डॉ. मनीष मोहरील, डॉ. संदीप भुरले, डॉ. नितीन भिंगारे, डॉ. फरहाना शेख, प्रा. रवी बोरकर, डॉ. प्यारेलाल भागवत, डॉ. सुभाष जाधव, डॉ. नाझिया रशिदी, डॉ. यादवराव सोळंके, डॉ. प्रशांत बागेश्वर, डॉ. अख्तरुन्नीसा कुरेशी, प्रा. गणेश वानखडे आदींनी परिश्रम घेतले.

Yavatmal Edition
13 September 2023 Page No. 3
epaper.navarashtra.com



**Ku. Priya Kailash Sendurkar**
**3rd merit & College Topper**



**Ku. Shweta Santosh Kale**
**4th merit**



**Shri. Abhay Ramdas Kute**
**4th merit**

*Published news of students who appeared in Merit in Navrashtra News Paper*



नवराष्ट्र

# मुंगसाजी महाविद्यालयाची मेरिटची परंपरा कायम

**दारव्हा, (ता.प्र.).** स्थानीक मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे विद्यार्थी गत 5 वर्षांपासून सतत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकताना दिसत आहेत. यंदाही या महाविद्यालयाने ही परंपरा कायम राखली असून उन्हाळी परीक्षेत एकूण चार विद्यार्थी विद्यापीठातून मेरिट आले आहेत.

यामध्ये एम.ए. अर्थशास्त्रचे 3 विद्यार्थी व एम.ए. इतिहासचा 1 विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत आला आहे. एमए अर्थशास्त्रची विद्यार्थिनी प्रिया शेंदुरकर तिसरी मेरिट असून स्वेता काळे व अभय कुटे यांनी चौथा मेरिट प्राप्त केला. तर एमए इतिहासमधून मनीष ठवकर नववा मेरिट आला. उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी अभिनंदन केले.

Yavatmal Edition
26 December 2023 Page No. 3
epaper.navarashtra.com



namo.maharashtra@hotmail.com

नमो महाराष्ट्र

# मुंगसाजी महाराज महाविद्यालयाची मेरिटची परंपरा कायम

**नमो महाराष्ट्र, प्रतिनिधी**

**दारव्हा :** स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथील चार विद्यार्थ्यांनी गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती च्या गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी 2023 च्या परीक्षेत महाविद्यालयातील एम. ए. अर्थशास्त्र विभागातून तीन विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले. त्यामध्ये कु. प्रिया कैलास शेंदुरकर हीने तिसरे तर कु. श्वेता संतोष काळे व श्री. अभय रामदास कुटे या दोघांनीही चौथे स्थान प्राप्त केले. सोबतच महाविद्यालयातील एम. ए. इतिहास या विभागातून एका विद्यार्थ्यांने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत नववे स्थान प्राप्त केले. यामध्ये श्री. मनीष भरत ठवकर या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय त्यांचे आई-वडील, विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. वसंत घुईखेडकर, विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ. संगीताताई घुईखेडकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत, उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शंकर सावंत व इतिहास विभाग प्रमुख डॉ. संदीप भुरले आदी मान्यवरांना दिले.

*Published news of students who appeared in Merit in Punynagari News Paper*

# MUNGASAJI MAHARAJ MAHAVIDHAYALAYA,

# DARWHA, DIST. YAVATMAL

## DEPARTMENT OF ECONOMICS

### Session 2023-2024

*Organizing Deree distribution Programe on 8/9/2023*




*Dr. Shankar Sawant in Charge of Student induction Programe on 12 July 2023*




*Dr. Shankar Sawant during Tree Plantation on 19 July 2023*




***Dr. Shankar Sawant while expressing the presidential message in the NSS special camp of the college on January 31, 2024***




***Inaugurating the workshop on 8 February 2024***




***Coordination the workshop on 8 February 2024***




***Dr. Shankar Sawant welcoming Dr. Sunil Chakaliya, President, Vice-Principal, for the inaugural program of the Board of Economics Studies on 13 February 2024***



पुण्य नगरी

# मुंगसाजी महाराज महाविद्यालयात 'शाश्वत उपाय'वर कार्यशाळा

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी

**दारव्हा :** येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात ८ फेब्रुवारी रोजी अर्थशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने इको फ्रेंडली कॅम्पससाठी शाश्वत उपाय या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचा अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनिल चकवे, प्रमुख वक्त डॉ. प्रवीण खांडवे, मोघे इंजिनियरिंग कॉलेज, बडनेरा तसेच प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत, डॉ. संतोष चतुर, डॉ. खुशाल ढवळे, वाणिज्य विभाग प्रमुख, डॉ. मनीष मोहरील, डॉ. नितीन भिंगारे, डॉ. संदीप भुरले, प्रा. रवी बोरकर, प्रा. गणेश वानखडे, प्रा. प्रियंका रुईकर, डॉ. अख्तरून्नीसा कुरैशी, डॉ. फराहणा शेख आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख वक्ते डॉ. प्रवीण खांडवे यांनी आज मानवाच्या अति महत्त्वाकांक्षेपोटी पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. मानवाने पर्यावरण प्रदूषणाकडे लक्ष न दिल्यास त्याचे परिणाम येणाऱ्या पिढीला भोगावे लागतील. त्यामुळे पर्यावरण प्रदूषण कमी करण्याकरिता प्रत्येकाने पर्यावरणाला घातक असणाऱ्या वस्तूंचा वापरच करू नये. पर्यावरण प्रदूषक वस्तूंची दुरुस्ती करून त्याचा वापर करावा. पर्यावरण प्रदूषक वस्तूंची पुर्नवाटणी करून त्यावर प्रक्रिया करावी, असे मत व्यक्त केले. डॉ. सुनील चकवे यांनी आज आपण मोठ्या प्रमाणात पर्यावरण प्रदूषण करत आहे. याचे परिणाम येणाऱ्या पिढीवर होतील. त्यामुळे येणाऱ्या पिढीच्या विनाशाचे कारण आजच्या वर्तमान पिढीने न बनता भविष्यातील पिढीचा सर्जनाकरिता पर्यावरण प्रदूषण थांबवण्याचा प्रयत्न करण्याचे आवाहन केले. संचालन अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. शंकर सावंत यांनी केले. प्रास्ताविक डॉ. संतोष चतुर यांनी केले. प्रा. रवी बोरकर यांनी आभार मानले.

Smart Yavatmal Edition
Feb 10, 2024 Page No. 02
Powered by: https://way2Smart.in/

***Published news of Workshop in Punynagri News Paper***

हिंगोली HINGOLI LOKPRASHNA

# लोकप्रश्न

संपादक- मदन शेळके पाटील

• महाराष्ट्र राज्य • शनिवार, दि. १० फेब्रुवारी २०२४ • RNI NO. MAHMAR/2021/84714

## प्रत्येकाने पर्यावरण मित्र बनने काळाची गरज- डॉ. प्रवीण खांडवे

### मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे शाश्वत उपाय या विषयावर कार्यशाळा संपन्न

**दारव्हा तालुका प्रतिनिधी/सागर चक्रे** –दारव्हा स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे दिनांक ८ फेब्रुवारी रोजी अर्थशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व आय.क्यू.ए.सी. यांच्या संयुक्त विद्यमाने इको फ्रेंडली कॅम्पस साठी शाश्वत उपाय या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचा अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनिल चकवे सर तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. प्रवीण खांडवे, मोघे इंजीनियरिंग कॉलेज, बडनेरा तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत सर, डॉ. संतोष चतुर, डॉ. खुशाल ढवळे, वाणिज्य विभाग प्रमुख, डॉ. मनीष मोहरील, डॉ. नितीन भिंगारे, डॉ. संदीप भुरले, रासेयो कार्यक्रम अधिकारी, प्रा. रवी बोरकर, प्रा. गणेश वानखडे, प्रा. प्रियंका रुईकर, डॉ. अख्तरून्नीसा कुरैशी, डॉ. फराहणा शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते गाडगे



बाबांच्या प्रतिमेचे पूजन विद्यापीठ गीत घेऊन कार्यशाळेची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी कार्यशाळेचे प्रमुख वक्ते डॉ. प्रवीण खांडवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

*Published news of Workshop in Lokprashan News Paper*

### मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे शाश्वत उपाय या विषयावर कार्यशाळा

## प्रत्येकाने पर्यावरण मित्र बनने काळाची गरज : डॉ. प्रवीण खांडवे

**दारव्हा :** स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे दिनांक 8 फेब्रुवारी 2024 रोजी अर्थशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व आय.क्यू.ए.सी. यांच्या संयुक्त विद्यमाने इको फ्रेंडली कॅम्पस साठी शाश्वत उपाय या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचा अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनिल चकवे सर तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. प्रवीण खांडवे, मोघे इंजीनियरिंग कॉलेज, बडनेरा तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत सर, डॉ. संतोष चतुर, डॉ. खुशाल ढवळे, वाणिज्य विभाग प्रमुख, डॉ. मनीष मोहरील, डॉ. नितीन भिंगारे, डॉ. संदीप भुरले, रासेयो कार्यक्रम अधिकारी, प्रा. रवी बोरकर, प्रा. गणेश वानखडे, प्रा. प्रियंका रुईकर, डॉ. अख्तरून्नीसा कुरैशी, डॉ. फराहणा शेख आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन विद्यापीठ गीत




घेऊन कार्यशाळेची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी कार्यशाळेचे प्रमुख वक्ते डॉ. प्रवीण खांडवे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना स्पष्ट केले, की आज मानवाच्या अति महत्वकांक्षेपोटी पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. मानवाने पर्यावरण प्रदूषणाकडे लक्ष न दिल्यास त्याचे परिणाम येणाऱ्या पिढीला भोगावे लागतील. त्यामुळे पर्यावरण प्रदूषण कमी करण्याकरिता प्रत्येकाने पर्यावरणाला घातक असणाऱ्या वस्तूंचा वापरच करू नये. काही वस्तूंचा वापर करणे गरजेचेच असेल तर तो करावा मात्र त्याचा उपयोग कमी करण्याचा प्रयत्न करावा. तसेच आपल्याकडून पर्यावरण प्रदूषक वस्तूंचा वापर होतच असेल तर त्याचा पुनर्वापर करावा. पर्यावरण प्रदूषक वस्तूंची दुरुस्ती करून त्याचा वापर करावा. पर्यावरण प्रदूषक वस्तूंची पुर्नवाटणी करून त्यावर प्रक्रिया करावी. सोबतच पर्यावरण प्रदूषक वस्तूंना वापरून पर्यावरणाच्या परिसरात फेकून न देता तिचा संचय करून ठेवावा, जेणेकरून कालांतराने त्यापासून खात प्राप्त होतील असे मत व्यक्त करून, पर्यावरण मित्र बना असे आव्हान केले. कार्यक्रमाचा अध्यक्ष स्थानावरून आपले मत व्यक्त करतांना महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे सर यांनी प्रमुख वक्त्यांच्या भाषणाचा आढावा घेऊन आज आपण मोठ्या प्रमाणात पर्यावरण प्रदूषण करत आहे. याचे परिणाम येणाऱ्या पिढीवर होतील त्यामुळे येणाऱ्या पिढीच्या विनाशाचे कारण आजच्या वर्तमान पिढीने न बनता भविष्यातील पिढीचा सर्जनाकरिता पर्यावरण प्रदूषण थांबवण्याचा प्रयत्न करा असे आव्हान केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. शंकर सावंत यांनी तर कार्यशाळेचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. संतोष चतुर तसेच कार्यशाळेचे आभार प्रदर्शन प्रा. रवी बोरकर यांनी केले. या कार्यशाळेचा यशस्वीतेकरता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . विलास राऊत सर यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील डॉ. शंकर सावंत, डॉ. संतोष चतुर, डॉ. खुशाल ढवळे, वाणिज्य विभाग प्रमुख, डॉ. मनीष मोहरील, डॉ. नितीन भिंगारे, डॉ. संदीप भुरले, रासेयो कार्यक्रम अधिकारी, प्रा. रवी बोरकर, प्रा. गणेश वानखडे, प्रा. प्रियंका रुईकर, डॉ. अख्तरून्नीसा कुरैशी, डॉ. फराहणा शेख आदी मान्यवरांनी अथक प्रयत्न केले.

*Published news of Workshop in Namo Maharashtra News Paper*

***On 13th February 2024 at the inauguration of Honorable Board of Studies in Economics***




***Dr. Sanjay Rachalwar Wadhavani College Yavatmal on the occasion of inauguration and guest lecture of Economics Board on 13th February 2024***





पुण्य नगरी

# सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी

**दारव्हा** : येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात १३ फेब्रुवारी रोजी सामाजिक शास्त्र अंतर्गत अर्थशास्त्र, इतिहास व समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन व अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे, प्रमुख अतिथी डॉ. जयंत चतुर, प्रा. रवी. बोरकर, प्रा. सुनील डंभारे यांची उपस्थिती होती. अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन व प्रमुख अतिथी डॉ. संजय राचलवार, प्रमुख अतिथी डॉ. सिद्धार्थ जाधव,, समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटक डॉ. पुरुषोत्तम बांडे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटक डॉ. संजय राजलवार यांनी स्टार्टअप इंडियाचे भारताच्या रोजगारात योगदान या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्टार्ट अप इंडियात



अनेक महत्त्वपूर्ण उद्योग असून त्या उद्योगातून निर्माण होणारा स्वाभिमानी रोजगार आजच्या विद्यार्थी वर्गाजवळ उपलब्ध आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले. डॉ. सिद्धार्थ जाधव यांनी प्राचीन युगात महिलांचे कार्य आणि कर्तृत्व, या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचीन युगात महिलांनी भारताच्या उज्ज्वलते करिता महत्त्वपूर्ण योगदान दिले असून त्यांच्या योगदानामुळेच आजची स्त्री ही आत्मनिर्भर व स्वयंपूर्ण बनली असल्याचे सांगितले. डॉ. पुरुषोत्तम बांडे यांनी समाजशास्त्रातील व्यावसायिकता या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी जीवनात कोणत्याही प्रकारचा व्यवसाय स्वीकारताना तो व्यवसाय सामाजिक असावा. तसेच त्या व्यवसायातून समाजाचे हित जोपासल्या जावे. समाज विघातक व्यवसायांचा स्वीकार आजच्या तरुणांनी करू नये, असे आवाहन त्यांनी केले. उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे यांनी विविध अभ्यास मंडळ अंतर्गत होणाऱ्या कार्यक्रमाचा लाभ विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हिताकरिता करून घ्यावा, असे आवाहन केले. संचालन इतिहास विभाग प्रमुख डॉ. संदीप भुरले तर प्रास्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नितीन भिंगारे यांनी केले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शंकर सावंत यांनी आभार मानले. यशस्वितेकरिता विविध अभ्यास मंडळातील पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

Smart Yavatmal Edition
Feb 14, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com


*On 21 March 2024, Dr. Shankar Sawant while giving a lecture on Personality Development and National Service Scheme at NSS Special Camp of Jijamata College Darwa at Bhulai.*




*On April 8, 2024, Dr. Shankar Sawant while expressing his thoughts as the chief guest in the workshop at Green Campus of Jijamata College Darwha.*




*Opinion expressed by Dr. Shankar Sawant on the budget of 2024-25 in dainik Deshonnati newspaper*



**देशातील लोकांचा भ्रमनिराश म्हणजे २०२४-२५ चा अर्थसंकल्प**

२०२४-२५ चे अंदाज पत्रक निवडणूकपूर्व अंदाजपत्रक असल्यामुळे ते अंतरिम अंदाजपत्रक आहे. नव्याने स्थापन होणारे सरकार त्यामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणत असल्याचे संदर्भ यापूर्वीच्या निवडणूक पूर्व अंदाज पत्रकातून आपल्याला पाहायला मिळतात. हे अंदाजपत्रक निवडणूक पूर्व अंदाजपत्रक असल्यामुळे होणाऱ्या निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्ष पुन्हा सत्तेवर यावा या उद्देशाने अंदाजपत्रकाच्या माध्यमातून भरगच्च आश्वासने दिल्या गेलेली दिसून येतात. अंदाज पत्रकामध्ये जुन्याच बाबी नव्याने मांडण्याचा प्रयत्न या ठिकाणी झालेला दिसून येतो. २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात जुन्याच गोष्टी भारदस्त शब्दांचा वापर करून नव्याने मांडल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अंदाजपत्रकातून देशातील लोकांना काही विशेष प्राप्त होताना दिसून येत नाही परिणाम स्वरूप अंदाजपत्रकातून देशातील लोकांचा भ्रमनिरास होत आहे.

**- डॉ. शंकर मारोती सावंत, अर्थशास्त्र प्राध्यापक दारव्हा**



*Shri Amol Anandrao Raut*
*3rd merit & College Toppe*



*Shri. Nandkishor Suresh Ingole*
*8th merit*



देशोन्नती

कळ.( ता.प्र.)

## दारव्ह्याचे तीन विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

देशोन्नती वृत्तसंकलन

**दारव्हा** : येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे तीन विद्यार्थी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सत्र २०२३- २४ च्या गुणवत्ता यादीत झळकले.

यावर्षी सुद्धा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांनी स्थान प्राप्त करून परंपरा अखंडित ठेवली. त्यात एम. ए. गृह अर्थशास्त्राची विद्यार्थिनी कु. सुचिता चरण राठोड हिने विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत दुसरे स्थान, एम. ए. अर्थशास्त्र विभागातून अमोलआनंदराव राऊत याने विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत तिसरे तर एम. ए. अर्थशास्त्र मधूनच नंदकिशोर सुरेश इंगोले यांनी गुणवत्ता यादीतआठवे स्थान प्राप्त केले. या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. वसंत घुईखेडकर, सचिव डॉ. संगीता घुईखेडकर, उपाध्यक्ष विराज घुईखेडकर, प्राचार्य डॉ. सुनील चकवे, तसेच अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शंकर सावंत यांना दिले. (ता. प्र.)

Yavatmal Edition
Jan 17, 2025 Page No. 7
Powered by: erelego.com



पुण्य नगरी

## मुंगसाजी महाराज विद्यालयाचे तीन विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी

**दारव्हा** : येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील तीन विद्यार्थी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकले.

यामध्ये एम.ए. गृह अर्थशास्त्राची विद्यार्थिनी सुचिता चरण राठोड हिला दुसरे स्थान तर एम.ए. अर्थशास्त्र विभागातून अमोल आनंदराव राऊत यांनी तिसरे तसेच एम.ए. अर्थशास्त्र मधून नंदकिशोर सुरेश इंगोले यांनी गुणवत्ता यादीत आठवे स्थान प्राप्त केले. गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंतभाऊ घुईखेडकर, विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ.संगीताताई घुईखेडकर, विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष विराज घुईखेडकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील चकवे तसेच गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संगीता घुईखेडकर व अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शंकर सावंत यांना दिले.

Yavatmal Edition
Jan 17, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# MUNGASAJI MAHARAJ MAHAVIDHAYALAYA, DARWHA, DiST. YAVATMAL

***DEPARTMENT OF ECONOMICS***

***Session 2024-2025***

*On the occasion of the Eco Friendly Campus Workshop on March 19, the dignitaries worshiped the Idol of Gadge Maharaj.*




*Dr. Shankar Sawant, while introducing the eco -friendly campus workshop on March 19,2025*



*19 March 2025, Eco Friendly Campus Workshop News published in Daily Tarun Bharat newspapers*

# Make efforts to create sustainable environment

**DARWHA / NAGPUR POST:** Today, environmental problems are becoming a problem of quality of life. Therefore, everyone should make efforts to create a sustainable environment. Only if students create a sustainable environment in the coming era, the existence of life can survive in the future. Therefore, to create a sustainable environment, everyone should reflect their home, workplace, village in an eco-friendly environment, appealed Dr. Purushottam Bande. A workshop on the topic of eco-friendly campus was held at Mungsaji Maharaj College Darwha on March 19 in collaboration with the Department of Economics, IQAC and the National Service Scheme Department. He was speaking on this occasion. Dr. Sunil Chakve presided over. Dr. Purushottam Bande was the inaugurator and chief guide. Organisers of the workshop Dr. Shankar Sawant, Dr. Santosh Chatur, Dr. Khushal Dhawale, Head of Commerce Branch Dr. Sandeep Bhurle, Dr. Manish Moharil, Prof. Ravi Borkar, Dr. Nitin Bhingare, Dr. Akhtarruntrisa Qureshi, Prof. Priyanka Ruikar were present. Dr. Shankar Sawant delivered the introductory remarks. Ankit Nichle conducted the function and Om Khodankar proposed the vote of thanks.

*19 March 2025, Eco Friendly Campus Workshop News published in Daily Hindusthan newspapers*

हिंदुस्थान
अमृत महोत्सव
गुरूवार दि.२० मार्च २०२५
भारतीय सौर ०५ चैत्र शके १९४७
Email: ytlhindu@gmail.com
www.dainikhindusthan.com
यवतमाळ

# मुंगसाजी महाराज महाविद्यालयात इको फ्रेंडली कॅम्पस

**दारव्हा, दि.१९**
**(तालुका प्रतिनिधी)**

दिनांक १९ मार्च २०२५ रोजी स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे अर्थशास्त्र विभाग, आय. क्यू. ए.सी व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने इको फ्रेंडली कॅम्पस या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



याप्रसंगी कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनील चकवे तर उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. पुरुषोत्तम बांडे, कार्यशाळेचे आयोजक डॉ. शंकर सावंत, डॉ. नाझिया रशिदी, डॉ. संतोष चतुर, डॉ. खुशाल ढवळे, डॉ. संदीप भुरले, डॉ. मनीष मोहरील, प्रा. रवि बोरकर, डॉ. नितीन भिंगारे, डॉ. अख्तरस्त्रीसा कुरैशी, प्रा.कु. प्रियंका रुईकर, डॉ. फरहाना शेख, प्रा. गुणरत्न कांबळे, प्रा. विकास पाईकराव आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व आहार अर्पण करून तसेच फीत कापून कार्यशाळेचे उद्घाटन केले. कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. पुरुषोत्तम बांडे, प्राचार्य डॉ. सुनील चकवे यांनी प्रमुख मार्गदर्शकाच्या भाषणाचा आढावा घेऊन प्रत्येक विद्यार्थ्याने पर्यावरण पूरक कृती करण्याकरता प्रयत्न करावे व पर्यावरणीय संरक्षण करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकित निचळे व आभार प्रदर्शन ओम खोडनकर या विद्यार्थ्यांनी तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शंकर सावंत यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेकरिता माय दलाचे प्राचार्य डॉ. सुनील चकवे सर यांच्या मार्गदर्शनात अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ . शंकर सावंत, आय. क्यू. ए. सी. कॉर्डिनेटर डॉ. नाझिया रशिदी, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप भुरले यांनी अथक प्रयत्न केले कार्यशाळेला महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

*19 March 2025, Eco Friendly Campus Workshop News published in Daily Deshonnati newspapers*

# देशोन्नती

## मुंगसाजी महाराज महाविद्यालयात 'इको फ्रेंडली कॅम्पस' कार्यशाळा



देशोन्नती वृत्तसंकलन

**दारव्हा** : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे १९ मार्च रोजी सकाळी ११ वा. 'इको फ्रेंडली कॅम्पस' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळा अर्थशास्त्र विभाग, आय.क्यू.ए.सी. आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने पार पडली. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील चकवे होते, तर उद्घाटन व प्रमुख मार्गदर्शन डॉ. पुरुषोत्तम बांडे, जिजामाता महाविद्यालय, दारव्हा यांनी केले.

कार्यशाळेची सुरुवात गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून झाली. त्यानंतर फीत कापून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. पुरुषोत्तम बांडे यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले.

'कार्यशाळेच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. सुनील चकवे यांनीही पर्यावरणपूरक कृतीसाठी विद्यार्थ्यांना पुढाकार घेण्याचे आवाहन केले. डॉ. शंकर सावंत यांनी प्रास्ताविक केले. अंकित निचळे यांनी संचालन तर ओम खोडनकर यांनी आभार प्रदर्शन केले. यशस्वीतेसाठी डॉ. शंकर सावंत, डॉ. नाझिया रशिदी, डॉ. संदीप भुरले यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेला प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. **(श.प्र.)**

Yavatmal Edition
Mar 21, 2025 Page No. 6
Powered by: erelego.com

*19 March 2025, Eco Friendly Campus Workshop News published in Daily Punyanagari newspapers*

# पुण्य नगरी

**डॉ. पुरुषोत्तम बांडे यांचे प्रतिपादन** | **मुंगसाजी महाराज महाविद्यालयात कार्यशाळा**

## इको फ्रेण्डली कॅम्पस उपक्रम ही संकल्पना नसून कृतीचे आव्हान

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी

**दारव्हा** : आज प्रत्येकाकरिता पर्यावरणीय समस्या ही त्यांच्या जीवनमानाची समस्या ठरत आहे. त्यामुळे शाश्वत पर्यावरण निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्नकरावा. येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांकडून शाश्वत पर्यावरण निर्माण होत असेल तरच भविष्यात जीवसृष्टीचे अस्तित्व टिकू शकते. यासाठी प्रत्येकाने आपले घर, आपले कामाचे ठिकाण, आपले गाव आदी परिसराला इको फ्रेण्डली परिसरामध्ये परावर्तित करावे. इको फ्रेण्डली कॅम्पस उपक्रम ही केवळ संकल्पना नाही तर कृतीचे आव्हान असल्याचे प्रतिपादन डॉ. पुरुषोत्तम बांडे यांनी केले.

येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग, आयक्यूएसी व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने इको फ्रेंण्डली कॅम्पस या विषयावर कार्यशाळेचे आयोजन १९ मार्च करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील चकवे तर उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक डॉ. पुरुषोत्तम बांडे, कार्यशाळेचे आयोजक डॉ. शंकर सावंत, डॉ. नाझिया रशिदी, डॉ. संतोष चतुर, डॉ. खुशाल ढवळे, डॉ. संदीप भुरले, डॉ. मनीष मोहरील, प्रा. रवी बोरकर, डॉ. नितीन भिंगारे, डॉ. अख्तररून्नीसा कुरैशी, प्रा. प्रियंका रुईकर, डॉ. फरहाना शेख, प्रा. गुणरत्न कांबळे, प्रा. विकास पाईकराव आदिंची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. पुरुषोत्तम बांडे यांनी सांगितले, विद्यार्थी प्राध्यापक कर्मचारी प्रशासक आणि व्यापक समुदाय एकत्रितपणे काम करून शिक्षण वाढ आणि विकासासाठी शाश्वत आणि पर्यावरणीयदृष्ट्या जागृकता निर्माण करतात. महाविद्यालय ज्ञानाच्या आधारावर तरुणाने इको फ्रेण्डली कॅम्पस हा समाजावर प्रभाव पाडण्याची क्षमता असलेल्या या बदलाला चलना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. महाविद्यालय केवळ शैक्षणिक केंद्र नसून शाश्वत जीवनाचे मॉडेल देखील असावे. पर्यावरणीय जागृकता आणि इको फ्रेंडली कॅम्पस कृतीची संस्कृती जोपासण्याचे काम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांने करावे व त्यामधून पर्यावरण पूरक हरित कॅम्पसची संकल्पना निर्माण करावी असे आव्हान केले. प्राचार्य डॉ. सुनील चकवे यांनी प्रमुख मार्गदर्शकाच्या भाषणाचा आढावा घेऊन प्रत्येक विद्यार्थ्यांने पर्यावरणपूरक कृती करण्याकरता प्रयत्न करावे व पर्यावरणीय संरक्षण करावे, असे आव्हान केले. संचालन अंकित निचळे यांनी केले, तर आभार ओम खोडनकर या विद्यार्थ्यांनी केले. प्रास्ताविक डॉ. शंकर सावंत यांनी केले.



कार्यशाळेच्या यशस्वीतेकरिता माय दलाचे प्राचार्य डॉ. सुनील चकवे यांच्या मार्गदर्शनात अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शंकर सावंत, आयक्यूएसी कॉर्डिनेटर डॉ. नाझिया रशिदी, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप भुरले यांनी प्रयत्न केले. कार्यशाळेला महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

Yavatmal Edition
Mar 24, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

*Dr. Shankar Sawant Delivering Vote of Thanks to the degree distribution program on March 29, 2025*




*On April 8, 2025, Dr. Shankar Maroti Sawant while lecturing on the practical importance of economics at Bori Arb of Arts and Commerce College.*





***Shri. Nandkishor Suresh Ingole***
***6th merit & College Toppe***



हिंदुस्थान
पुरोगामी राष्ट्रीय विचारांचे दैनिक
अमृत महोत्सव
बुधवार दि.३१ डिसेंबर २०२५
भारतीय सौर ११ पौष शके १९४७
Email: ytlhindu@gmail.com
www.dainikhindusthan.com
यवतमाळ जिल्हा

# मुंगसाजी महाराज महाविद्यालयात मेरिटची प्रथा

**दारव्हा, दि.३०(तालुका प्रतिनिधी)** मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथील पदव्युत्तर अभ्यास क्रमात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ च्या परीक्षेत विद्यार्थ्यांना भरघोस यश मिळून पाच अभ्यासक्रमाचे विद्याथी गुणवत्ता यादीत झळकले आहेत.

यामध्ये रोहिणी नेमीचंद पवार ६ वी मेरीट विषय राज्यशास्त्र, चंद्रशेखर सदाशिवराव खाडे ८ वा मेरीट विषय अर्थशास्त्र, चंदा बाळू पांडे ९ वी मेरीट विषय समाज शास्त्र, आचल श्रीकृष्ण ठाकरे ९ वी मेरीट एम कॉम, आणि आफ्रिन अंजुम हैदरखान पठाण ९ वी मेरीट विषय वनस्पतीशास्त्र, या सर्व विद्यार्थ्यांचे संपूर्ण परिसरात आणि महाविद्यालयात कौतुक होत आहेत त्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील आणि सर्व प्राध्यापक वृंद व विषय शिक्षक डॉ. शंकर सावंत, डॉ. नितीन भिंगारे, डॉ.खुशाल ढवळे, प्रा. विकास पाईकराव आणि प्रा. कोमल अस्वार यांना दिले आहे. संस्थेचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, सचिव डॉ. संगीता घुईखेडकर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनील चकवे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

*News published in the Hindusthan News Paper of students who have been placed in the Merit list of the SGBAU University*

लोकमत

# एम.एम. महाविद्यालयाचे पाच विद्यार्थी गुणवत्ता यादीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**दारव्हा :** मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील पाच विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षेत गुणवत्ता यादीत झळकले आहे.

रोहिणी नेमीचंद पवार राज्यशास्त्रात ६वी मेरिट, चंद्रशेखर सदाशिव खाडे अर्थशास्त्रात ८वा मेरिट, चंदा बाळू पांडे समाजशास्त्रात ९वी मेरिट, आंचल श्रीकृष्ण ठाकरे एमकॉम ९वी मेरिट, आफ्रिन अंजुम हैदरखान पठाण वनस्पतीशास्त्रात ९वी मेरिट आली आहे. विद्यार्थ्यांच्या यशाचे संस्थेचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर, सचिव डॉ.संगीता घुईखेडकर, प्राचार्य डॉ.सुनील चकवे, डॉ.शंकर सावंत, डॉ.नितीन भिंगारे, डॉ.खुशाल ढवळे, प्रा.विकास पाईकराव, प्रा.कोमल अस्वार यांनी कौतुक केले.











Hello Yavatmal
Page No. 2 Dec 30, 2025
Powered by: erelego.com

*News published in the daily Lokmat News Paper of students who have been placed in the Merit list of the SGBAU University*

# MUNGASAJI MAHARAJ MAHAVIDHAYALAYA,

# DARWHA, DiST. YAVATMAL

***DEPARTMENT OF ECONOMICS***

***Session 2025-2026***




***Dr. Shankar Sawant introducing the guests and introducing the Workshop on 26/2/2026***




***Dr. Ramdhan U. Hire was the keynote speaker while guiding the Workshop on 26/2/2026***

*The news of the workshop came to Daily Lokpeashan newspaper*

# विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कृतीतून हरित कॅम्पस साकारावा

## डॉ.रामधन हिरे यांचे प्रतिपादन : मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे कार्यशाळा

**हिंगोली लोकप्रश्न/ सागर चक्रे**

**दारव्हा** : दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा येथे अर्थशास्त्र विभाग, आय.क्यू.ए.सी. व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ह्यग्रीन कॅम्पस कसा असावा या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील चकवे सर होते. उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. रामधन हिरे (जिजामाता महाविद्यालय, दारव्हा) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास आयोजक डॉ. शंकर सावंत, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. नाझिया रशिदी, कला शाखाप्रमुख डॉ. संतोष चतुर, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप भुरले यांच्यासह प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, विद्यापीठ गीत व फीत कापून करण्यात आली. प्रमुख मार्गदर्शक डॉ. रामधन हिरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, पर्यावरणीय समस्या आज प्रत्येकाच्या जीवनमानाशी थेट जोडल्या गेल्या आहेत. शाश्वत पर्यावरणासाठी केवळ चर्चा नव्हे, तर प्रत्यक्ष कृती आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या घरापासून महाविद्यालय व गावपरिसरापर्यंत वृक्षलागवड, स्वच्छता, संसाधनांची बचत व जनजागृती यांद्वारे हरित परिसर उभारावा, असे आवाहन त्यांनी केले. हरित कॅम्पस ही संकल्पना उपक्रमापुरती न राहता सातत्यपूर्ण कृतीत उतरली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

दुसरे वक्ते डॉ. संतोष चतुर यांनी दारव्हा परिसरातील प्रदूषणाच्या समस्या मांडत विद्यार्थ्यांनी स्थानिक पातळीवर पर्यावरणपूरक उपाय राबवून यवतमाळ जिल्ह्यात आदर्श निर्माण करावा, असे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. सुनील चकवे सर यांनी अतिरिक्त भौतिक सुखांच्या अतिरेकामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचे नमूद करून, विद्यार्थ्यांनी साधेपणा स्वीकारत पर्यावरणसंरक्षणासाठी जनजागृती करावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकित निचळे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. साक्षी मडावी यांनी केले. प्रास्ताविक डॉ. शंकर सावंत यांनी मांडले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र विभाग, आय.क्यू.ए.सी., रासेयो विभाग व स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा येथे पर्यावरणीय परिसर सुंदर कसा असावा या विषयावर कार्यशाळा संपन्न

**प्रतिनिधी / अमरावती दर्शन**

**यवतमाळ, ६ मार्च** : दिनांक 26 फेब्रुवारी 2026 रोजी स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे अर्थशास्त्र विभाग, आय. क्यू. ए. सी. व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रीन कॅम्पस कसा असावा या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचेप्राचार्य डॉ. सुनील चकवे सर तर उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. रामधन हिरे, जिजामाता महाविद्यालय दारव्हा सोबतच कार्यशाळेचे आयोजक डॉ. शंकर सावंत, डॉ. नाझिया रशिदी, आय. क्यू. ए. सी. कॉर्डिनेटर, डॉ. संतोष चतुर, कला



शाखाप्रमुख, डॉ. संदीप भुरले, रासेयो कार्यक्रम अधिकारी, डॉ. मनीष मोहरील, प्रा. रवि बोरकर, डॉ. नितीन भिंगारे, डॉ. अख्तररुक्षीसा कुरैशी, डॉ. कु. प्रियंका रुईकर, डॉ. फरहाना शेख, प्रा. गुणरत्न कांबळे, प्रा. विकास पाईकराव, प्रा. गणेश वानखडे, प्रा. ओम देशमुख, प्रा. कु. कल्याणी गावंडे, प्रा. कु. अर्चना इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व हारअर्पण करून तसेच विद्यापीठ गीत व फीत कापून कार्यशाळेचे उद्घाटन केले. कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. रामधन हिरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना स्पष्ट केले की, आज प्रत्येकाकरिता पर्यावरणीय समस्या ही त्यांच्या जीवनमानाची समस्या ठरत आहे. त्यामुळे शाश्वत पर्यावरण निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या कृतीतून पर्यावरण रक्षणाचे कार्य करावे, येणाऱ्या युगात विद्यार्थ्यांनी पर्यावरण जनजागृती व कृती केली तरच भविष्यात जीवसृष्टीचे अस्तित्व टिकू शकते. पर्यावरण बचावाकरिता विशेषता राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनीपर्यावरणनिर्मितीचे व जनजागृतीचे कार्य केल्या जाते परंतु हेच कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यासह महाविद्यालयातील सर्व घटकांनी केल्यास पर्यावरण निर्मिती होऊ शकते. म्हणून पर्यावरणाची निर्मिती करण्याकरिता प्रत्येकाने आपले घर, आपले कामाचे ठिकाण, आपले गाव आदी परिसराला वृक्षांनी आच्छादित करून आपल्या कामाच्या ठिकाणाला सुंदर अश्या पर्यावरणीयपरिसरामध्येपरावर्तित करावे. आपल्या कार्याचा परिसर पर्यावरणीय बनवणे हा केवळ उपक्रम नसून ही एक प्रत्यक्षात केला जाणारी कृती आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या कार्य परिसराला पर्यावरणीय बनवावे असे आव्हान केले. पर्यावरण निर्मिती ही एक सामाजिक जबाबदारी आहे. ज्यामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी, प्रशासक आणि व्यापक समुदायाने एकत्रितपणे काम करून पर्यावरणीय दृष्ट्या जागृकता निर्माण करावी.




*Dr. Sunil B. Chakave  Sir, the principal of the college while introducing the Degree Distribution Ceremony 0n 28/3/2026*




*Chief Guest Shri. Vijay Suryavanshi, Sub-Divisional Officer, Darwha while expressing his thoughts 0n 28/3/2026*




*Chief Guest Dr Head of Dept. of Music, Ane Mahila  Mahavidyalaya Yavatmal & Member of Academic Council & Music, BOS SGBAU, while expressing his thoughts 0n 28/3/2026*




*Secretary  of the organization Mr. Vasant Ghuikhedkar while expressing his Presidential Speech*




*Shri. Chandrashekhar Sadashiv Khade felicitated by dignitaries for Eight merit in MA Economics from the university*




*Vote of thanks to the degree distribution ceremony, Dr. Shankar Sawant*

# देशोन्नती

## मुंगसाजी महाराज महाविद्यालयात पदवी वितरण



दारव्हा : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे २८ मार्चला पदवी वितरण समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ. संगीताताई घुईखेडकर होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. चंद्रशेखर कुडुमेथे व उपविभागीय अधिकारी विजय सूर्यवंशी उपस्थित होते.

यावेळी डॉ. कुडुमेथे यांनी विद्यार्थ्यांनी सोशल मीडियावर नव्हे तर कौशल्य विकासावर भर देत स्वतःचे अस्तित्व सिद्ध करावे, असे आवाहन केले. तसेच विजय सूर्यवंशी यांनी पदवीच्या जोरावर पुढील आयुष्यात प्रगती साधण्याचे मार्गदर्शन केले. माजी प्राचार्य डॉ. विलास राऊत यांनी स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून उच्च पदे मिळविण्याचे आवाहन केले. एकूण ३२८ पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. विविध विषयांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सुनील चकवे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. खुशाल ढवळे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. शंकर सावंत यांनी केले. (श. प्र.)

Yavatmal Edition
Mar 30, 2026 Page No. 6
Powered by: erelego.com

*News published by this newspaper Daily Deshonnati of the Degree Distribution ceremony*

## मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे पदवी वितरण समारोह

### ■ विद्यार्थ्यांनी कौशल्य विकासावर भर द्यावा – डॉ. चंद्रशेखर कुडुमेथे

प्रा डॉ नितीन भींगारे / दारव्हा प्रतीनीधी:

मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे दिनांक २८ मार्च२०२६रोजी पदवी वितरण समारंभ संपन्न झाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संगीताताई घुईखेडकर, सचिव, विद्या प्रसारक मंडळ दारव्हा तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ प्रतिनिधी डॉ. चंद्रशेखर कुडमेथे यवतमाळ; प्रा श्री. विजय सूर्यवंशी उपविभागीय अधिकारी दारव्हा ;प्राचार्य डॉ. सुनील चकवे, माजी प्राचार्य डॉ. विलास राऊत, उपप्राचार्य डॉ. प्रशांत बागेश्वर, डॉ. नाझिया रशिदि आदी मान्यवर उपस्थित होते. प्रथम गाडगेबाबांच्या प्रतिमाचे पूजन व हारार्पन करून त्यांना अभीवादन करण्यात आले . प्राचार्य डॉ. सुनिल बि. चकवे यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला . यावेळी डॉ . चंद्रशेखर कुडमेथे आपल्या मनोगतात म्हणाले की विद्यार्थ्यांनी स्व कौशल्य विकासात आपले अस्तीत्व सिद्ध करावे .यावेळी विजय सूर्यवंशी उपविभागीय अधिकारी यांनी विद्यार्थ्यांनी आपण मिळविलेल्या




पदवी द्वारा आपले जीवन सफल करावे असे म्हटले आहे .तर डॉ विलास राऊत माजी प्राचार्य यांनीही आपले मनोगत यावेळी व्यक्त केले .अध्यक्ष स्थानाहून बोलतांना डॉ . संगीताताई घुईखेडकर म्हणाल्या की दारव्हा परिसरातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण संस्थेने उपलब्ध करून दिल्याने आजचा दिवस प्रेरणादायी ठरला . विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या पदवीचा उपयोग स्वताचा सर्वांगीण विकास करून घेण्यासाठी करावा . यावेळी मान्यवरांनी सन्मान पुर्वक पदवीचे वितरण पात्र विद्यार्थ्यांना केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. खुशाल ढवळे तर आभार प्रदर्शन डॉ. शंकर सावंत यांनी केले. पदवी वितरण समारंभाच्या यशस्वीते करीता महाविद्यालयीन कर्मचारी वृंदानी सरकार्य दिले

तब्बल पांच वर्षांनी

*News published by this newspaper Weekly Yog Yogeshwar of the Degree Distribution ceremony*

लोकमत

# एमएम कॉलेजमध्ये पदवी वितरण समारोह

लोकमत न्यूज नेटवर्क

**दारव्हा :** सध्याचे युग संगणक, नवनवीन तंत्रज्ञान आणि एआयचे आहे. या युगात विद्यार्थ्यांनी स्किल ओरिएंटेड बनून स्वतःला सिद्ध करावे, असे आवाहन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ प्राधिकरणाचे प्रतिनिधी डॉ. चंद्रशेखर कुडमेथे यांनी केले.

येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात पदवी वितरण समारोहात त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव डॉ. संगीता घुईखेडकर होत्या. उपविभागीय अधिकारी विजय सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. सुनील चकवे, माजी प्राचार्य डॉ. विलास राऊत, उपप्राचार्य डॉ. प्रशांत बागेश्वर, डॉ. नाझिया रशिदी आदी मंचावर उपस्थित होते.



याप्रसंगी कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील एकूण ३२८ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी समयोचित विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. खुशाल ढवळे, आभार डॉ. शंकर सावंत यांनी मानले.

यशस्वीतेसाठी डॉ. प्यारेलाल भागवत, डॉ. मनीष मोहरील, डॉ. नितीन भिंगारे, प्रा. प्रियंका रुईकर, प्रा. नेहा माहुरकर तसेच डॉ. संतोष चतुर, प्रा. रवी बोरकर, प्रा. सुनील डंभारे, डॉ. संदीप भुरले, डॉ. अख्तरुन्नीसा कुरेशी, डॉ. फरहाना शेख, प्रा. धनश्री कोठेकर, प्रा. गणेश वानखडे, प्रा. दिनेश बावणे, प्रा. विकास पाईकराव, प्रा. अर्चना इंगळे, प्रा. प्रतिभा भगत, नेहा ढोमणे, साक्षी मडावी, प्रियंका अगम, आरती बागल, अंकित निचळे, शोएब शेख, ओम खोडणकर, गौरव खडसे, प्रशिक खाडे, पवन राठोड, आदींनी पुढाकार घेतला. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Hello Yavatmal
Page No. 3 Apr 02, 2026
Powered by: erelego.com

*News published by this newspaper Weekly Yog Yogeshwar of the Degree Distribution ceremony*

# मुंगसाजी महाराज महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ उत्साहात

**हिंगोली लोकप्रश्न**
**दारव्हा | सागर चक्रे**

दारव्हा येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात दिनांक 28 मार्च 2026 रोजी पदवी वितरण समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा टप्पा ठरणाऱ्या या समारंभात मान्यवरांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली. समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संगीताताई घुईखेडकर (सचिव, विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा) होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ चे प्रतिनिधी डॉ. चंद्रशेखर कुडुमेथे (संगीत विभाग प्रमुख, अणे महाविद्यालय, यवतमाळ) उपस्थित होते. याशिवाय उपविभागीय अधिकारी प्रा. विजय सूर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील चकवे, माजी प्राचार्य डॉ. विलास राऊत, उपप्राचार्य डॉ. प्रशांत बागेश्वर, डॉ. नाझिया रशिदी (आय.क्यू.ए.सी. समन्वयक) यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन व विद्यापीठ गीताने करण्यात आली. प्राचार्य डॉ. सुनील बी. चकवे यांनी प्रास्ताविकातून पदवी वितरण समारंभाचा उद्देश स्पष्ट करत महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा विद्यार्थ्यांसमोर मांडला.

कौशल्य विकासावर भर देण्याचे आवाहन प्रमुख पाहुणे डॉ. चंद्रशेखर कुडुमेथे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्पष्ट केले की, आजचा युवक व्हॉट्सअॅप, फेसबुक, इन्स्टाग्रामसारख्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर आपले अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो; मात्र खरी गरज ही कौशल्य विकासात स्वतःला सिद्ध करण्याची आहे. आई-वडिलांचा त्याग आणि गुरुजनांचे मार्गदर्शन यामुळेच विद्यार्थी या टप्प्यापर्यंत पोहोचतात, याची जाणीव ठेवून पुढील आयुष्यात स्वतःच्या कर्तृत्वावर उंच भरारी घ्यावी, असे त्यांनी सांगितले. तसेच एआय आणि संगणकाच्या युगात स्किल-ओरिएंटेड बनण्याचे आवाहनही त्यांनी केले. उपविभागीय अधिकारी प्रा. विजय सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना मिळालेली पदवी ही अमूल्य संपत्ती असल्याचे सांगत, तिच्या बळावर पुढील जीवनात यश मिळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. माजी प्राचार्य डॉ. विलास राऊत यांनी स्पर्धा परीक्षांद्वारे उच्च पदे मिळविण्याची संधी विद्यार्थ्यांसमोर असल्याचे सांगून कठोर परिश्रमाची गरज अधोरेखित केली. अध्यक्षीय भाषणातून प्रेरणा अध्यक्षीय भाषणात डॉ. संगीताताई घुईखेडकर यांनी विद्या प्रसारक मंडळाच्या माध्यमातून दारव्हा परिसरात उपलब्ध झालेल्या उच्च शिक्षणाच्या संधींचा आढावा घेतला. तसेच सहकार महर्षी स्व. बाळासाहेब घुईखेडकर व त्यांच्या सहकाऱ्यांचे योगदान स्मरून कृतज्ञता व्यक्त केली.




*News published by this Daily newspaper Lokprashan of the Degree Distribution ceremony*